महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.३७४(२)/स्थापत्य/२०१९/१४-ब दिनांक:- २४ सप्टेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- कोरोना विषाणू (Covid १९) प्रादुर्भावाच्या अनुषंगाने मुलाखतीकरीता उमेदवारांना सूचना.**
**संदर्भ:- जाहिरात क्र. ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १७/२०१९.**

कोरोना विषाणूचा (Covid १९) प्रादुर्भाव वाढू नये यासाठी उमेदवारांनी घ्यावयाची काळजी :-

(१) मुलाखतीला येताना किमान तीन पदरी कापडाच्या मास्कचा (Mask) वापर करणे अनिवार्य आहे.
(२) वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.
(३) उमेदवारांकडे स्वतःचा सॅनिटाईझर असावा व त्याचा वेळोवेळी वापर करावा.
(४) शारीरिक / परस्पर अंतराच्या (Social Distancing) नियमावलीचे कटाक्षाने पालन करावे.
(५) कोव्हिड-१९ सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इत्यादी दिसून येत असल्यास आयोगाच्या कार्यालयास आगाऊ कळवावे.
(६) संसर्ग टाळण्यासाठी नाक, तोंड व डोके यांना स्पर्श करणे टाळावे.
(७) टिश्यू पेपरचा वापर केल्यास वापरानंतर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून द्यावा.
(८) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी शासनाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

ठिकाण- मुंबई.

उपसचिव, परीक्षा-२
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.